निवड

पतीपत्नी मधील नाते हे काय असते ?

नातं...चिनीमातीच्या सुरेखश्या भांड्यामधील एक नाजूक गुलाबाचे रोप...मोठ्या प्रेमाने दोन मनांनी निगराणी राखलेलं...त्यावर प्रतिदिनी टवटवीत गुलाब डवरतो....आणि रोप अधिकाधिक मनमोहक बनू लागतं.
की नातं हे येशू ख्रिस्त आहे....क्रुसावर टांगलेलं...कळत नकळत...एकेक खिळा त्यावर ठोकला जातो...आणि काळ उलटेल त्यावेळी जे हाताशी लागेल ते निश्चेष्ट कलेवर असते ?

संसारातील गोष्टी ह्या बऱ्याचदा छोट्या छोट्याच असतात. नाजूक असतात. संसार एक चालवायला घेतला तरी दोन पूर्णत: वेगवेगळी व्यक्तिमत्त्वे त्यासाठी एकत्र आलेली असतात. वेगवेगळ्या नोकऱ्या वा वेगवेगळे काढलेले बालपण ह्यामुळे मित्र परिवार वेगळा असतो. आणि मग हे असे निर्णय घेण्याचे क्षण उभे रहातात.

प्रेमात पडणे, लग्न करून घर सांभाळणे, नोकरी...मातृत्व....आणि आता घर एकटीच्या खांद्यांवर येऊन पडणे...ह्या सर्व घटना कधी आवडीने तर कधी नाईलाजाने जगत गेल्यावर, आज मला जाणवते, जे मला दिसते ते हे असे...

कोणी खत घालावयाचे...कोणी खिळा ठोकायचा ही त्यात्या वेळची, ज्याचीत्याची निवड असते. संसारात, रोज दिवसागणिक आपल्याला काहीनाकाही 'निवड' करणे भाग पडते. कधी विचारपूर्वक तर कधी एखाद्या क्षणात आपण आपली निवड ठरवून टाकतो. आणि त्यावेळी पतीपत्नीच्या नाजूक नात्याला खत घातले गेले की त्यावर अजून एक खिळा ठोकला गेला हे शेवटी काळ ठरवतो.

आज मी एक स्त्री आहे...आणि ह्या सर्व घटनांतून मी स्वत: गेले आहे.
पुरुषांच्या भूमिकेत शिरून एखाद्या घटनेकडे बघणे फार अवघड आहे असे मला वाटत नाही. ह्याला कारण आहे. जाहिरात क्षेत्रात, रोज नवे काम समोर येते. त्यावेळी नित्य नव्या 'टारगेट ग्रुप' साठी एखादी जाहिरात करावयाची असते. वेगवेगळ्या वयोगटाचे...कधी स्त्री तर कधी पुरुष. त्यामुळे आज स्त्रीच्या तर उद्या पुरुषाच्या भूमिकेत शिरण्याची एक सवय मनाला पडून गेलेली आहे. कधी गरज पडली तर अल्लड ७/८ वर्षाची मुलगी होणे, वा कधी साठ वर्षांच्या एखाद्या भारतीय पुरुषाच्या मानसिकतेत डोकावणे, फारसे अवघड जात नाही. आणि त्यातून आयुष्यात वेगवेगळ्या घडामोडींना सामोरं जावे लागल्याकारणाने, व माझ्या कामाच्या ढंगामुळे, कधी एखादी स्त्री कसा विचार करेल, वा कधी एखादा पुरुष एखादी घटना कशी

घेईल हा विचार आता अंगवळणी पडला आहे.

आज म्हटलं तर फुलपाखरू बनणे वा उद्या कचऱ्याच्या डब्याची आत्मकहाणी लिहिणे...ह्यात असे अवघड ते काय ?

त्यामुळे, मी पुढे मांडलेले विचार, हे...'साल्या ह्या बायका ना ! वैतागे रे !' किंवा 'ह्यांना ना...च्यायला नवरे...कायम ह्यांच्या कुशीत लागतात !'...असा विचार करून सोडून द्यावेत असे मला नाही वाटत. हे अशा प्रकारचे पुरुषांचे विचार देखील माझ्या ओळखीचे आहेत ह्याला कारण आहे. हा असा विचार करणारे पुरुष सुद्धा मी आसपास बघितले आहेत.

कधी एखादी सहल, कधी एखादा चित्रपट, नाटक बघण्याचे बेत ठरू लागतात.
३०/३२ वयोगटाचा तरुण पती विचार करू लागतो...जाण्याचा...पत्नीला घेऊन जाण्याचा बेत आखू शकत नाही...घरात लहान मूल आहे. ती बाळाला टाकून येऊ शकत नाही. मग ? त्या वेळी त्याने निर्णय घेतला सहल न टाळण्याचा...एक दिवसाची तर सहल...सक्काळी जाणार रात्रीपर्यंत परत येणार...त्यात काय मोठं...घरी ती तापाने फणफणलेल्या बाळाच्या उशाशी बसून...कपाळावर घड्या ठेवत...रात्री तो जेव्हां पुन्हा तिच्यासमोर उभा रहातो...त्यावेळी बाकी काहीच बदललेलं नसतं...फक्त एक खिळा वाढलेला असतो.

एखादी सहल...आणि त्याच दिवशी बायकोच्या माहेरी लग्न...तो मित्रांना कळवून टाकतो....मला नाही जमणार....घरी लग्न आहे...मित्रांची सहल काही त्याच्यासाठी थांबत नाही...पण इथे मात्र अजून एक टपोरा गुलाब त्या पतीपत्नीच्या नात्यावर उगवलेला असतो.

तर दुसऱ्या कोणा एकासाठी, बायकोच्या माहेरचे लग्न, हे मित्रांबरोबर ठरवलेला नाटकाचा बेत टाळण्यासाठीचं सबळ कारण असू शकत नाही....तो नाटकाला जातो...बायको एकटीच नवऱ्याशिवाय माहेरच्या नातेवाईकांसमोर आनंदी चेहेऱ्याने उभी रहाते...हा एक खिळा असतो.

छोट्या मुलीच्या अंगात १०५ ताप..मित्रांबरोबर ठरवलेली दुबईच्या वाळवंटातील 'डेझर्ट सफारी'...त्या भर तापात मुलीला घेऊन निघण्यासाठी जेव्हां एखादा नवरा आपल्या बायकोला भरीस घालत असतो...त्यावेळी तो एक असाच खिळा त्या येशूच्या हातावर मारत असतो.

तर दुसरा कोणी...रंगात आलेला सहलीचा बेत...अचानक ओढवलेले बायकोचे आजारपण...आणि मग सहलीचा मोह टाळून त्याचे तिच्याबरोबर घरी रहाणे. एक टपोरा गुलाब उगवलेला असतो.

खिळे अंगावर झेलणारी नाती...
कालौघात त्यांची लक्तरे होतात. ती लक्तरे अंगावर लेऊन उघडी पडलेली नाती.

आणि हाती फक्त प्रेत लागते.

आणि टपोऱ्या गुलाबांनी फुललेले एखादे रोप...
आयुष्याची बाग हसरी, ताजी, टवटवीत ठेवते...
आणि त्या सुगंधी बागेला वयाची अट नसते.

- अनघा निगवेकर

http://restiscrime.blogspot.com